‘प्रेसनोट’

चारकोप पोलीस ठाणे येथे एम.डी. या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या आरोपीस मुद्देमालासह अटक

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती तसेच मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. शशिकुमार मीना यांनी अंमली पदार्थ नशामुक्त मुंबई शहर या दृष्टीकोनातून वेळोवेळी केलेले मार्गदर्शनामुळे चारकोप पेालीस ठाणे येथे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी म्हणून कार्यरत असलेले सपोनि राजू थोरात यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश बळवंतराव तसेच मा. सपेाआ गोराई विभाग अति. कार्यभार मालवणी विभाग श्री. सुधाकर हुंबे व मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परि. ०२, बोरीवली मुंबई श्री. संदीप घुगे (भापोसे) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन गिजे यांच्या निगराणीखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि राजू थोरात, स.पो.नि. सचिन निकाळजे, पो.ह.क्र. ०४१०३८/स्वप्निल शिंदे, पो.ह.क्र. ९७१०५९/संतोष तरडे, पो.ह.क्र. ०३१३६२/घनश्याम पाटेकर, पो.शि.क्र. १७००४३/ तुषार शिंदे, पो.शि.क्र. १९११४४/तुषार चौधरी, पोशि. ११.३५७९ / आकाश यादव यांनी दिनांक २८/१०/२०२६ रोजी सापळा पंचनामा रचून दुपारी १४.३५ वा. च्या सुमारास साईधाम नगरजवळील, गोराई खाडी वरील पुलाजवळ, आरपीडी रोड नंबर ५, चारकोप, कांदीवली पश्चिम, मुंबई या ठिकाणी इनोव्हा मो/ कार क्र. एमएच ४७ ए ३६३६ यामध्ये एमडी हा अंमलीपदार्थ विक्री करीता आलेला आरोपी वासुदेव लक्ष्मण पाटील उर्फ मामा, वय ५५ वर्षे रा.ठि. रुम नं. २८, सोसायटी नंबर ३१५, मुक्तीधाम को.ऑप.हौ.सोसा.लि., सेक्टर नंबर ०३, चारकोप, कांदीवली (प.), मुंबई ४०००६७ यास शिताफिने ताब्यात घेवून पंचांसमक्ष सापळा पंचनाम्याद्वारे त्याच्या अंगझडतीमध्ये १०.३२ ग्रॅम वजनाचा अंदाजे रु. २५,०००/- किंमतीचा ‘एम.डी.’ हा व्यावसायिक प्रमाणात विक्री करीता ताबे कब्जात बाळगले स्थितीत रंगेहाथ पकडण्यात यश आले आहे. नमूद आरोपी इसमाविरुद्ध चारकोप पोलस ठाणे गु.र.क्र. ९०७/२०२६ कलम ८(क), २२(क) एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून नमूद आरोपी यास अटक करण्यात आली आहे.

आरोपीच्या अंगझडतीमध्ये तो वापरत असलेला आयफोन मोबाईल फोन (किंमत रुपये १०,०००/-) तसेच इनोव्हा मोटार कार (किंमत रुपये १०,००,०००/-) तसेच रोख रक्कम रु. २,०००/- असे एकूण १०,३७,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील सपेानि सचिन निकाळजे हे करीत आहेत.